# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१३३ दिनांक - ०४/०४/२०२४

## जबरी चोरीचा गुन्हा उघड करण्यास नवघर पोलीस ठाण्यास यश

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २१९/२०२४ भा.दं.वि.सं.कलम-३९४, ३४ प्रमाणे दि.०३/०४/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री मोखई रामप्रसाद निशाद, वय-४५ वर्षे, व्यवसास- मजुरी रा. जय अंबे नगर चाळ, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे मुळ रा.ग्राम-सहिजाना, पोस्ट-हमजापुर, तहसिल अकबरपुर, जि.अंबेडकर नगर, राज्य उत्तरप्रदेश हे मजुरीचे काम करतात. दिनांक ३१/०३/२०२४ रोजी सायंकाळी ०४.०० वा.चे सुमारास फिर्यादी हे नवघर फाटक रोडवर असलेल्या चर्चजवळील बस स्टॉप, भाईंदर पुर्व येथुन जात असतांना दोन अनोळखी इसमांनी ठोश्याबुक्क्यांनी मारहाण करुन त्यांचे खिशातुन १०,०००/- रुपये रोख रक्कम जबरीने चोरी करुन पळुन घेवुन गेलेबाबत फिर्यादी यांनी नवघर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारवरुन वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरची बाब ही गंभीर असल्याचे लक्षात घेवुन मा.पोलीस उप-आयुक्त. परिमंडळ-०१, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त. नवघर विभाग तसेच मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक. नवघर पोलीस ठाणे यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याअनुशंगाने गुन्हे प्रकटीकरपण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी प्रथम गुन्हयाचे घटनास्थळाला भेट देवुन गुन्हयाचे ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करुन नमुद सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली असता सदरचा गुन्हा नवघर पोलीस ठाणे रेकॉर्डवरील आरोपी नामे गौरव संभाजी सुर्यवंशी, वय-२३ वर्षे, व्यवसाय-बेकार रा. रुम नंबर ३०३, ए विंग, ओस्तवाल टॉवर, नवघर रोड, खारीगाव, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे याने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.गुन्हातील मद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन. सदर गुन्हा हा विधीसंघर्षग्रस्त बालक याचे मदतीने केला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.राजेंद्र मोकाशी सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक(गुन्हे) अशोक कांबळे, सपोनि संदिप पालवे, पोउनि-ज्ञानेश्वर आसबे, पोह-०७०९७/भुषण पाटील, ०६११७/संतोष पाटील, पोह-०७१६२/सुरेश चव्हाण, पोह-१२०१८/नवनाथ घुगे, पोशि-१३११८/ओंकार यादव, पोशि-१३०७८/सुरजसिंग घुनावत, पोशि-अस्वर, पोशि-पवार तसेच मसुब/कुणाल हिवाळे यांनी केलेली आहे.